IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भारतीय संविधानाची अमृतवर्षे आणि लोकशाही भारत

**प्रथमेश दादासाहेब कसबे**
गोगटे - वाळके कॉलेज, बांदा

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
भारतीय संविधान
लोकशाही

**ABSTRACT**

भारतीय संविधानाने भारताच्या लोकशाही राष्ट्रनिर्मितीत गेल्या ७५ वर्षांत आधारस्तंभाची भूमिका पार पाडली. विविधता, बहुलता, सामाजिक न्याय, समानता व स्वातंत्र्य या मूल्यांना संस्थात्मक रूप देत संविधानाने आधुनिक भारताचा नकाशा घडवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील संविधान मसुदा समितीने दिलेली मानवी हक्कांची चौकट आजही राज्यकारभाराची दिशा निश्चित करते. या संशोधनात संविधानाची वैशिष्ट्ये, काही घटनादुरुस्त्यांमधील बदल (1950–2025), लोकशाहीवरील समकालीन धोके, माध्यमस्वातंत्र्य, सोशल मीडियाचा प्रभाव तसेच नागरिकशाही व संविधान-साक्षरतेचे महत्त्व यांचा अभ्यास केला आहे. Freedom House व World Press Freedom Index यांसारख्या जागतिक अहवालांच्या आधारे भारताच्या लोकशाहीतील मागासलेपणाची कारणेही विश्लेषित केली आहेत. लोकशाही ही "We the People" ची सामूहिक जबाबदारी असून तिच्या संरक्षणासाठी संविधानिक मूल्यांची पुनर्स्थापना, नागरिकांचा सक्रिय सहभाग, पारदर्शक शासन आणि स्वायत्त संस्था यांची मजबुती अनिवार्य आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Kasbe, P. D. (2025). भारतीय संविधानाची अमृतवर्षे आणि लोकशाही भारत. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), 277–284.

**प्रस्तावना (introduction) :**

संविधान निर्मितीची पार्श्वभूमी पाहता भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्वीच सुरू झाली. १९४६ च्या कॅबिनेट मिशन योजनेनुसार संविधान सभा स्थापन झाली. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक पार पडली. डॉ. राजेंद्र प्रसाद स्थायी अध्यक्ष होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते. मूलभूत अधिकार समिती, अल्पसंख्यांक समिती, प्रांतिक समित्या अशा विविध अंगांचे नेतृत्व त्यांनी प्रभावीपणे केले.

भारतीय संविधान हे लोकशाहीचा पाया असून गेल्या ७५ वर्षांत राष्ट्रनिर्मितीत अतुलनीय योगदान दिले आहे. विविधतेने नटलेला देश ऐकतेच्या सूत्रात बांधून ठेवण्यात, समाजजीवनाला मूल्याधिष्ठित दिशा देण्यात, न्याय, समानता व स्वातंत्र्याची हमी देण्यात संविधानाने निर्णायक भूमिका बजावली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रचलेल्या संविधानाने भारताला आधुनिक, लोकशाहीप्रधान आणि परिवर्तनशील राष्ट्र बनवले. भविष्यात संविधान साक्षरता, डिजिटल अधिकार, पर्यावरण संरक्षण व सामाजिक न्याय वाढवण्याची गरज आहे. संविधान हा एक फक्त दस्तऐवज नसून, भारताचा आत्मा आणि प्रगतीचा नकाशा आहे.भारतीय संविधानाचा ७५ वर्षांचा प्रवास अनेक अर्थांनी यशस्वी ठरला. विविधतेने नटलेल्या समाजाला एकत्र बांधणे, हिंसाचारग्रस्त भारताला स्थिर करणे, लोकशाही मूल्यांची रुजवण, न्यायव्यवस्था स्वतंत्र ठेवणे, सामाजिक न्यायाची अंमलबजावणी, डिजिटल युगातील बदलांचा स्वीकार या सर्व गोष्टी संविधानामुळे शक्य झाल्या.

तरीही अंधश्रद्धा, जातीयता, धार्मिक ध्रुवीकरण, राजकीय स्वार्थ, भ्रष्टाचार, स्त्रीभेद, आर्थिक असमानता—हे प्रश्न अद्याप कायम आहेत. संविधानाने दिलेल्या सामाजिक-आर्थिक लोकशाहीची पूर्तता पूर्ण झाली नाही.

कलम ३२—संविधानाचा आत्मा

प्रस्तावनेतील "स्वातंत्र्य, समता,बंधुता"

स्त्री-पुरुष समानता, धर्मस्वातंत्र्य, सामाजिक न्याय,

केंद्र व राज्य संतुलन,लष्करशाही रोखणे व सत्तेची जबाबदारी लोकप्रतिनिधीकडे ठेवणे संविधानाची उपलब्धी म्हणावी लागेल.

**भारतीय घटनेची ठळक वैशिष्ट्ये :**

1) सर्वात मोठी लिखित राज्यघटना

2)संघराज्य राज्यव्यवस्था

3)संसदीय शासनपद्धती

4) ताठरता व लवचिकता यांचे एकत्रिकरण

5) संसदीय सार्वभौमत्व व न्यायिक सर्वोच्चता यांचे संतुलन

6)स्वतंत्र व एकात्मिक न्यायव्यवस्था

7)मूलभूत हक्क

8)राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे

9)एकेरी नागरिकत्व

10) सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धत

11)धर्मनिरपेक्ष राज्य

**काही घटनात्मक, राजकीय घडामोडी**

• प्रारंभिक काळ (1950 ते 1975 ) :

१९५० ते १९७० या दोन दशकांमध्ये भारतीय राज्यघटनेत अनेक महत्त्वपूर्ण घटनात्मक बदल आणि न्यायनिर्णय झाले. ए.के. गोपालन खटला (1950) हा वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मर्यादांबाबतचा पहिला मोठा निर्णय ठरला. त्यानंतरच्या पहिल्या घटनादुरुस्त्यांनी जमीन सुधारणा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आवश्यक त्या मर्यादा घालून सामाजिक-आर्थिक न्यायाची दिशा स्पष्ट केली. गोलकनाथ खटला (1967) हा संविधानाच्या इतिहासातील टप्पा ठरला; या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने संसद मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करू शकत नाही असे ठरवले. याच्या प्रत्युत्तर म्हणून संसदने २४ वी घटनादुरुस्ती (1971) करून कलम ३६८ मध्ये दुरुस्ती अधिकार स्पष्टपणे नोंदवले.

१९७३ मध्ये केशवानंद भारती खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने 'मूलभूत संरचना सिद्धांत' मांडला. या निर्णयानुसार संसदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार कायम ठेवण्यात आला, परंतु राज्यघटनेची मूलभूत रचना अबाधित ठेवणे आवश्यक आहे असे स्पष्ट करण्यात आले.

२६ वी घटनादुरुस्ती (1971) करून संस्थानिकांच्या खास भत्त्यांना (Privy Purses) समाप्ती देण्यात आली. १९७५ ते १९७७ या काळातील आणीबाणी हा भारतीय लोकशाहीचा सर्वांत वादग्रस्त काळ ठरला; या काळात नागरिकांचे अनेक मूलभूत हक्क निलंबित करण्यात आले. आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर केलेली ४२ वी घटनादुरुस्ती (1976) सर्वाधिक चर्चेत राहिली. प्रस्तावनेत "समाजवादी", "धर्मनिरपेक्ष" आणि "एकात्मता " हे शब्द जोडून राज्यघटनेचे स्वरूप अधिक स्पष्ट करण्यात आले.

• स्थिरता आणि सुधारणा काळ : (1976 ते 1990)

१९७५–७७ च्या आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीत लोकसभा आणि विधानसभांचा कार्यकाळ ५ वर्षांवरून ६ वर्षांपर्यंत वाढवणे, राष्ट्रपती व पंतप्रधानांच्या निवडणुकांबाबत न्यायालयीन पुनरावलोकन मर्यादित करणे तसेच प्रस्तावनेत समाजवाद, धर्मनिरपेक्षता आणि अखंडता या मूल्यांचा समावेश करण्यात आला. १९७७ मध्ये काँग्रेसचा पराभव होऊन मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली पहिले गैर-काँग्रेसी सरकार स्थापन झाले. जनता सरकारने १९७८ मधील ४४ व्या घटनादुरुस्तीत आणीबाणी जाहीर करण्याचे अधिकार मर्यादित केले, राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या सल्ल्याचा पुनर्विचार करण्याचा अधिकार दिला आणि मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्कातून वगळून कलम ३००-अ अंतर्गत कायदेशीर हक्क बनवला. १९८० मध्ये इंदिरा गांधींचे पुनरागमन झाले आणि पुढील काळात विविध प्रादेशिक प्रश्न व राजकीय अस्थिरता वाढली. १९८४ मध्ये ऑपरेशन ब्लूस्टारनंतर इंदिरा गांधींची हत्या झाली आणि राजीव गांधी पंतप्रधान झाले. १९८५ मध्ये दहावी घटनादुरुस्ती करून गोवा, दमण आणि दीव यांना केंद्रशासित दर्जा देण्यात आला. १९८० च्या दशकातील खलिस्तान चळवळ, आसाम करार आणि बोडो आंदोलनांनी केंद्र–राज्य संबंधांवर परिणाम केला. १९९० मध्ये मंडल आयोगाच्या अंमलबजावणी आणि राम जन्मभूमी आंदोलनामुळे सामाजिक ध्रुवीकरण वाढले व भारतीय राजकारणात मोठा बदल घडला.

• उदारीकरण व जागतिकीकरण (1991 ते 2010) :

१९९१ ते २०१० या काळात भारतीय राज्यघटनेत आणि शासनव्यवस्थेत अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले. १९९२ मधील ६९ व्या घटनादुरुस्तीमुळे दिल्लीला विशेष प्रशासकीय दर्जा मिळाला. त्याच वर्षी झालेल्या ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तींनी ग्रामपंचायती आणि नगरपालिकांना घटनात्मक दर्जा देऊन स्थानिक स्वराज्य संस्था अधिक सक्षम व स्वायत्त बनवल्या.

•२००२ मध्ये ८६ व्या घटनादुरुस्तीद्वारे ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी शिक्षण हा मूलभूत हक्क घोषित करण्यात आला, ज्यामुळे सामाजिक न्याय आणि मानवी विकासाच्या प्रक्रियेला नवे अधिष्ठान मिळाले.

•या कालखंडातील १९९१ चे आर्थिक उदारीकरण (LPG धोरण) जरी थेट घटनादुरुस्ती नव्हते, तरी त्याने भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले. परकीय गुंतवणूक, खासगीकरण आणि मुक्त बाजारव्यवस्थेला चालना देत सार्वजनिक क्षेत्राच्या भूमिकेत मोठी रूपांतरे घडली.

•१९९० च्या दशकात मुख्य निवडणूक आयुक्त टी.एन. शेषन यांनी निवडणूक प्रक्रियेतील गैरप्रकारांवर कठोर कारवाई करून आदर्श आचारसंहिता प्रभावीपणे अंमलात आणली. यामुळे निवडणूक आयोगाची विश्वासार्हता आणि संस्थात्मक शक्ती वाढली.

याच काळात न्यायिक सक्रीयतेलादेखील वेग आला. जनहित याचिकांद्वारे सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांनी पर्यावरण, मानवी हक्क, भ्रष्टाचार आदी महत्त्वाच्या क्षेत्रांत हस्तक्षेप करून नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण अधिक मजबूत केले. अशा प्रकारे या दोन दशकांत भारतीय लोकशाही अधिक विकेंद्रित, पारदर्शक आणि उत्तरदायी बनली.

• समकालीन काळ 2010 ते 2025 सद्यस्थिती :

लोकपाल आणि लोकायुक्त कायदा (2013)

हा कायदा केंद्र आणि राज्य स्तरावर भ्रष्टाचारविरोधी स्वतंत्र संस्था (लोकपाल व लोकायुक्त) स्थापन करण्यासाठी करण्यात आला. जनलोकपाल आंदोलनानंतर हा कायदा लागू झाला.

* 101 वी घटनादुरुस्ती – GST लागू

2016 मधील 101 व्या घटनादुरुस्तीतून वस्तू आणि सेवा कर (GST) भारतात लागू झाला. यामुळे अप्रत्यक्ष करांचा एकसंध राष्ट्रीय करप्रणाली लागू झाली.

३. कलम 370 रद्द (2019) :

2019 मध्ये जम्मू-कश्मीरला मिळालेला विशेष राज्याचा दर्जा हटवण्यात आला. त्यानंतर राज्याचे पुनर्गठन करून जम्मू-कश्मीर आणि लडाख अशी दोन केंद्रशासित प्रदेश तयार करण्यात आली.

४. डिजिटल गोपनीयता आणि डेटा सुरक्षा :

स्मार्टफोन, इंटरनेट व डिजिटल व्यवहार वाढल्यामुळे वैयक्तिक डेटाचे संरक्षण, माहितीची गोपनीयता, डेटा लीक, सायबर धोके या विषयांवर मोठी चर्चा सुरू झाली. यासाठी डेटा संरक्षण कायद्याची गरज अधोरेखित झाली.

५. समान नागरिक संहितेवरील चर्चा

सर्व धर्मांसाठी एकसमान नागरी कायदे लागू करण्याबाबत भारतात चर्चा चालू आहे. विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसा यासाठी एकच कायदा असावा का यावर मतभेद आहेत.

- CAA, NRC नागरिकत्व सुधारणा विधेयक, 2019.

निवडणूक आयोग, एक देश एक निवडणूक, ओबीसीचे राजकीय आरक्षण, राज्यपालांचे वर्तन, घटनेच्या 10 वी सूचीमधील पक्षांतर बंदी कायदा हे अलिकडील घटनात्मक राजकीय घडमोडी सांगता येतील.

- लोकशाही भारत आव्हाने व उपाय :

लोकशाही ही नागरिकांच्या सहभागाने आणि शासनाच्या उत्तरदायित्वाने टिकणारी राजकीय व्यवस्था आहे. भारताने 1950 मध्ये राज्यघटना स्वीकारल्यानंतर स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाहीची पायाभरणी केली. तथापि, अलीकडच्या काळात माध्यमांवरील नियंत्रण, राजकीय ध्रुवीकरण, सत्तेचे केन्द्रीयकरण, आंदोलकांचे अपराधीकरण, इंटरनेटवरील नियंत्रण, अभिव्यक्तीस्वातंत्र्यावर होणारे निर्बंध आणि न्यायपालिकेविषयी वाढती शंका ही चिंताजनक प्रवृत्ती असल्याचे अनेक अभ्यास आणि अहवाल सूचित करतात. Freedom House (2021) अहवालाने भारताला "Partly Free" म्हणून वर्गीकृत केल्याने लोकशाही आरोग्यावर गंभीर प्रश्न उपस्थित होतात. भारतीय लोकशाहीसमोरील वर्तमान धोके, नागरिकांच्या जबाबदाऱ्या, सोशल मीडियाची भूमिका, जाती-राजकारणाचा प्रभाव, पत्रकारितेचे स्वातंत्र्य आणि राज्यघटनेच्या मूल्यांचे अधःपतन यांचे विश्लेषण करतो. भारतीय लोकशाही कोणत्याही पक्षाची मक्तेदारी नसून, 'We the People' यांची सामूहिक जबाबदारी आहे की संविधानाचे रक्षण करणे, विवेक जागृत ठेवणे आणि सरकारवर रचनात्मक पद्धतीने अंकुश ठेवणे.

भारत हे जगातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जाते. भारतीय संविधानाने नागरिकांना मूलभूत हक्क दिले असून, लोकशाही शासनसंरचना, स्वायत्त संस्था, स्वतंत्र न्यायालयीन व्यवस्था आणि मुक्त माध्यमे ही लोकशाहीची आधारस्तंभे आहेत. तथापि, लोकशाही केवळ कायदेशीर व संस्थात्मक चौकटीवर चालत नाही; ती नागरिकांच्या विचारसरणीवर, राजकीय संस्कृतीवर आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या पातळीवर अवलंबून असते. नागरिकांमध्ये विवेक, बौद्धिक प्रामाणिकता आणि राजकीय सजगता नसल्यास, लोकशाहीची गुणवत्ता कमकुवत होऊ शकते.

अलीकडच्या राजकीय घटनाक्रमांमधून दिसून येते की सोशल मीडियावरील नियंत्रण, विरोधी आवाज दडपण्याची प्रवृत्ती, आंदोलनांना बदनाम करण्याचे प्रयत्न, धार्मिक ध्रुवीकरण, पत्रकारितेची पक्षनिष्ठा आणि न्यायव्यवस्थेवरील दबावाची शंका – या सर्व बाबींनी भारतीय लोकशाहीच्या स्वरूपावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

- लोकप्रतिनिधींची संवैधानिक मूल्ये आणि जबाबदारी :

भारताचे शासन संविधानावर चालते. यामुळे सार्वजनिक पदांवर असणाऱ्या जनप्रतिनिधींनी द्वेष, हिंसक विचारसरणी, भेदभाव किंवा सूडबुद्धीने कार्य करता कामा नये. संविधानाची शपथ घेताना ते देशाप्रती, नागरिकांप्रती आणि न्यायव्यवस्थेप्रती निष्ठा जपण्याची प्रतिज्ञा करतात. संविधानिक पदांचा वापर राजकीय हेतू, वैयक्तिक सूड किंवा पक्षनिष्ठा यासाठी केला तर लोकशाहीचे मूळ तत्वच धोक्यात येते.

कामकाजात पारदर्शकता, प्रशासकीय जबाबदारी, शांततापूर्ण संवाद आणि टीकेचा स्वीकार ही लोकशाहीतील अनिवार्य मूल्ये आहेत. सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी नागरिकांना प्रश्न विचारण्याचा हक्क आहे; हा हक्क कमकुवत झाला तर संविधानाचे संरक्षण धोक्यात येते.

• सोशल मीडियाची भूमिका आणि मतभेदांचे दमन :

अभिव्यक्तीस्वातंत्र्य हे लोकशाहीचे प्राणतत्त्व आहे. ट्विटर (एक्स,) यूट्यूब, व्हॉट्सॲप यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सनी अनेक स्वतंत्र विचारवंत, पत्रकार आणि नागरिकांना सरकारविषयी टीका करण्याची, सत्य पुढे आणण्याची संधी दिली. परंतु सोशल मीडियाचा दुरुपयोग, खोट्या बातम्यांचा प्रसार, द्वेषपूर्ण वक्तव्ये ही आव्हानेही उपस्थित झाली आहेत.

तथापि, अलीकडील काळात विरोधी विचार मांडणाऱ्या अनेकांचे अकाउंट्स बंद होणे, एफआयआर दाखल होणे, त्यांना देशद्रोही म्हणणे, सोशल मीडिया पोस्टवरून अटक करणे यांसारखी उदाहरणेही वाढत आहेत. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांचे अकाउंट बंद झाले होते, भारतात काही अभिनेते, लेखक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या अकाउंट्सवर कारवाई झाली.

प्रश्न असा की –

विरोधी विचार मांडणारे सर्वच लोक "देशद्रोही" कसे होऊ शकतात?

लोकशाहीत सरकारने टीकेस उत्तर देणे आवश्यक असते; टीका दाबणे नव्हे. टीकेला उत्तर देण्याऐवजी व्यक्तींना बदनाम करणे, ट्रोलिंग, कायद्याचा दुरुपयोग करणे, आंदोलकांना दडपणे ही हुकूमशाही प्रवृत्तीची चिन्हे आहेत.

• लोकशाही, मतभेद आणि लोकांचे सार्वभौमत्व :

देशात लोकतंत्र ही सर्वोच्च सत्ता आहे. सरकारे बदलतात पण लोकशाही मूल्ये बदलू नयेत.

विरोध आणि टीका ही निरोगी लोकशाहीची अंगे आहेत. फ्रान्समधील क्रांती, रशियन क्रांती, अमेरिका, स्वीडन या देशांतील इतिहास दाखवतो की नागरिक जागृत राहिल्यास लोकशाही मजबूत होते; नागरिक निष्क्रिय झाले तर सत्ता निरंकुश बनू शकते.

लोकशाहीत जर संस्था एका पक्षाच्या प्रभावाखाली गेल्या तर समस्या उद्भवू शकते.

• जाती राजकारण आणि सामाजिक असमानतेची आव्हाने :

भारताच्या लोकशाहीसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे जाती आधारित राजकारण. अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव मतदारसंघ असले तरी अनेकदा अशा उमेदवारांची परिस्थिती "कठपुतळी"सारखी दिसते. त्यांच्या स्वतंत्र भूमिकेला राजकीय पक्ष परवानगी देत नाहीत.

सामाजिक न्याय, समान संधी, भेदभावमुक्तता हेही तितकेच महत्त्वाचे. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांना मूलभूत हक्काचा दर्जा मिळाला असता तर सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्यास मदत झाली असती.

• चौथा स्तंभ म्हणून पत्रकारिता: स्वातंत्र्य आणि संकट :

पत्रकारिता ही लोकशाहीची चौथी स्तंभ आहे. परंतु जेव्हा माध्यमे सरकारची स्तुती करणारे "PR यंत्र" ( प्रसारण यंत्र) बनतात, तेव्हा नागरिकांच्या मानसविश्वावर कब्जा मिळवण्याचा धोका निर्माण होतो.

राजकीय भक्ती, पक्षनिष्ठ पत्रकारिता, विरोधी आवाजांना दुर्लक्षित करणे—ही सर्व लक्षणे लोकशाहीतील माध्यमस्वातंत्र्याला धक्का देतात.

पत्रकारांनी लोकांचा आवाज बनणे अपेक्षित आहे. पत्रकारिता ही सत्ताधीशांची गुलाम झाल्यास एकाधिकारशाहीकडे नेणारी पायरी ठरते.

- Freedom House (2021) च्या अहवालानुसार भारत "Partly Free" या श्रेणीत गेला होता.

विविध संस्था, EIU, व्ही -डेम च्या आकडेवारी नुसार 2024, 2025 चे आकडे फारसे समाधानकारक नाहीत.
हे घटक चिंताजनक म्हणता येतील:

•इंटरनेट सेन्सॉरशिप व बंदी

•माध्यमांवरील नियंत्रण

•शांततापूर्ण आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे

•पत्रकार, कार्यकर्त्यांना अटक

•अल्पसंख्याकांच्या हक्कांवरील दबाव

•सत्तेचे केन्द्रीकरण

या सर्व घटकांमुळे भारताची जागतिक लोकशाही क्रमवारी घसरली.

लोकशाहीतील चार स्तंभ — विधिमंडळ, कार्यकारी, न्यायपालिका, माध्यमे — यांची स्वायत्तता कमकुवत झाली तर अराजकता व सांप्रदायिकतेचे वातावरण निर्माण होऊ शकते.

• नागरिकांमध्ये, राजकीय जागरूकता आणि संवैधानिक साक्षरतेची गरज :

भारतात बौद्धिक प्रामाणिकता (intellectual honesty) आणि राजकीय सजगता अजूनही मर्यादित आहे.

नागरिक मतदान करतात पण राजकारणाचे विश्लेषण करत नाहीत.

जाहीरनामे, निर्णय, धोरणे — यांची तपासणी करणारी जनता कमी असल्याने सत्ताधारी पक्षावरचा अंकुश कमी होतो.

साक्षरता वाढली पण संविधान-साक्षरता वाढली नाही.

विवेकी, जागरूक आणि स्वतंत्र विचारांचे नागरिक असतील तरच लोकशाही टिकते.

नागरिकांनी पक्षभक्तीपेक्षा राष्ट्रभक्तीला प्राधान्य दिले पाहिजे.

विश्व प्रेस स्वातंत्र्य निर्देशांक 'रिपोर्टर्स विदाऊट बॉर्डर्स' ही संस्था तयार करते. हा निर्देशांक 180 देशांतील प्रेस स्वातंत्र्याची स्थिती मोजतो. प्रत्येक देशातील पत्रकारांना उपलब्ध असलेली अभिव्यक्तीची मुभा, बातम्या देताना त्यांना भेडसावणारे धोके आणि दडपण यांचे मूल्यांकन यात केले जाते. आज जागतिक पातळीवर प्रेस स्वातंत्र्य विविध आव्हानांना सामोरे जात आहे. आर्थिक दबाव, पत्रकारांवरील हिंसा, सरकारी सेन्सॉरशिप आणि माध्यम संस्थांच्या आर्थिक अडचणींमुळे प्रेसची स्वायत्तता कमी होत असून लोकशाहीच्या दृष्टीने ही गंभीर चिंता बनली आहे.विश्व प्रेस स्वातंत्र्य निर्देशांक 'रिपोर्टर्स विदाऊट बॉर्डर्स' संस्था तयार करते व 180 देशांतील माध्यम स्वातंत्र्याची स्थिती मोजतो. पत्रकारांची सुरक्षा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सरकारी हस्तक्षेप आणि माध्यमांवरील दबाव यांचा यात विचार केला जातो. भारताचा निर्देशांकातला क्रमांक अलीकडच्या वर्षांत घसरलेला दिसतो. पत्रकारांवरील हिंसा, राजकीय दबाव, खटले, ट्रोलिंग, तसेच माध्यम संस्थांवरील आर्थिक व मालकीगत नियंत्रण ही प्रमुख कारणे मानली जातात. डिजिटल सेन्सॉरशिप आणि दिशाभूल करणारी माहितीही आव्हानात्मक ठरते. या परिस्थितीमुळे भारतातील प्रेस स्वातंत्र्याला सतत धोका निर्माण होत आहे.2025 च्या आकडेवारीनुसार 180 देशाच्या यादीत भारताचे स्थान 151वे आहे.

- भारतीय लोकशाही मजबूत राहण्यासाठी आवश्यक घटक:

1. संविधानाचे निष्ठेने पालन
2. सरकारची उत्तरदायित्व स्वीकारण्याची तयारी
3. पत्रकारितेचे स्वातंत्र्य
4. न्यायिक स्वायत्तता
5. जातीय-धार्मिक ध्रुवीकरणाला विरोध
6. नागरिकांची राजकीय सजगता
7. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण

लोकांनी भीतीतून नव्हे तर विवेकातून वागले पाहिजे.
लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी नागरिकांनी प्रश्न विचारणे, सत्य जाणून घेणे आणि संविधान साक्षर होणे अनिवार्य आहे.

**निष्कर्श (Conclusion) :**

घटनात्मक बदल, न्यायालयीन निर्णय, दुरुस्त्या आणि सुधारणा यांनी संविधान अधिक सक्षम, लवचिक आणि स्थिर झाले. तथापि, अलीकडच्या काळात राजकीय ध्रुवीकरण, माध्यमांवरील नियंत्रण, सामाजिक असमानता, डिजिटल धोके आणि नागरिकांमधील संवैधानिक साक्षरतेची कमतरता यामुळे लोकशाहीवर आव्हाने निर्माण झाली आहेत. भारतीय लोकशाही जिवंत राहण्यासाठी संविधानाचे निष्ठेने पालन, सरकारची उत्तरदायित्व स्विकारण्याची तयारी, न्यायपालिका व माध्यमांची स्वायत्तता, नागरिकांची जागरूकता आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्याचे संरक्षण अनिवार्य आहे. लोकशाही ही फक्त कायदेशीर चौकट नसून, ती नागरिकांच्या सक्रिय सहभागावर, विवेकपूर्ण निर्णयावर आणि समाजातील नैतिक मूल्यांवर अवलंबून आहे. म्हणून, "We the People" ची सामूहिक जबाबदारी आहे की संविधानाचे रक्षण करणे, शासनावर रचनात्मक अंकुश ठेवणे आणि सामाजिक न्याय, समानता व स्वातंत्र्य या मूल्यांना प्रत्यक्षात आणणे. भविष्यातील भारताची प्रगती, लोकशाहीची गुणवत्ता आणि सामाजिक समता या सर्वांचा आधार हा संविधान असेल.

**References:**


1. Freedom House. (2021). Freedom in the World 2021: Democracy under siege. Freedom House.
2. Ambedkar, B. R. (1948). The Constitution of India: Draft and debates. Government of India.
3. Sen, A. (1999). Development as freedom. Oxford University Press.
4. Thapar, R. (2019). The public intellectual in India. Aleph Book Company.
5. Jayal, N. G. (2016). Citizenship and its discontents: An Indian history. Harvard University Press.
6. Gupta, D. (2017). Caste, state and society in India. Penguin Books.